न.प.ड.-२

SEAL OF THE SUB-REGISTRAR GR-I NIPHAD-2

वाचले :- १. श्री. गोपाळ केशव जाधव व इतर.१ रा. ओझर ता. निफाड जि.नाशिक यांचा दिनांक.१०/०२/२०११ रोजीचा बिनशेती परवानगी अर्ज.

२. म.सहा.संचालक,नगररचना, नासिक यांचेकडील पत्र क्रं.विशोप्रक्र./मौ. ओझर ता. निफाड ग.नं./स.न.२३९८/१ पैकी/सुमन/१५९२ दिनांक ६/५/२०११

---

उपविभागीय अधिकारी निफाड
भाग निफाड यांचे कार्यालय
क्रं.जमा/एनए/एसआर/२९/२०११
निफाड दि. [illegible]/०७/२०११

**आदेश :-**

महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम- १९६६ चे कलम- ४४ प्रमाणे व त्याखालील नियमान्वये श्री. गोपाळ केशव जाधव व इतर.१ रा. ओझर ता. निफाड जि.नाशिक यांना मौजे. ओझर ता. निफाड येथील ग.नं./स.नं.२३९८/१ पैकी क्षेत्र-११४०० चौ.मी. यातील भुखंड क्र.१ ते २१+१ सुविधा भुखंड यात निवासी या प्रयोजनासाठी अकृषिक परवानगी खालील अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :-**

१. महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम आणि त्याखालील नियम व महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम (सुधारीत १९७१ चे ) अधिन राहून परवानगी देण्यात येत आहे.
२. परवानादार यांनी आदेशातील प्लॅट व प्लॉटचे विभाजन माझे पुर्व संमतीशिवाय करु नये.
३. परवानादार यांनी सदरहू जमीन व त्यावरील बिल्डींग वा बांधकामाचा उपयोग ज्या कारणासाठी अकृषिक परवानगी दिली आहे. त्याच कारणासाठी करावा, तसेच सदरहू जमिनीचा किंवा जमिनीपैकी काही भागाचा वा त्यावरील बिल्डींगचा वा बांधकामाचा उपयोग इतर कारणासाठी करावयाचा झाल्यास त्यास या कार्यालयाची लेखी पुर्व संमती घ्यावी तसेच त्याच कारणासाठी बिल्डींगचा उपयोग हा संपुर्ण जमिनीचा उपयोग म्हणून मानण्यात येईल.
४. परवानादार यांनी हा आदेश दिलेल्या तारखेपासून एक वर्षाचे आंत जमिनीची सुधारणा, मंजूर ले-आऊटप्रमाणे म्हणजे रस्ते,ड्रेनेज इ.करावी की, ज्यानुळे माझी व संबंधीत ग्रामपंचायतीची संमती राहील त्याचप्रमाणे सदरहू ले-आऊटमधिल प्लॅाटची मोजणी व रेखांकन सर्वे खात्याकडून करुन घ्यावा व जो पर्यंत जमिनीची सुधारणा होत नाही तोपर्यंत त्यामधिल प्लॅाटची विल्हेवाट कोणत्याही त-हेने लावू नये.
५. परवानादार यांनी सदरहू जमिनीतील प्लॅाटची विल्हेवाट कोणत्याही त-हेने लावली तर परवानदार यांची जबाबदारी राहील की, सदरहू प्लॅाटची विक्री वा विल्हेवाट आदेशातील/सनदेतील अटी शर्तीस अधिन राहून करावी.
६. सदरहू परवानगी ही म.सहा.संचालक, नगररचना, नासिक यांचेकडील उक्त निर्दिष्ट पत्र क्रं.१५९२ दि.६/५/२०११ मधिल अटी व शर्तीस अधिन राहून मंजूरी देण्यात येत आहे. (सोबत झेरॉक्स प्रत) त्याचबरोबर मंजूर अभिन्यासातील देखाव्याच्या नकाशामध्ये दाखविल्याप्रमाणे मोकळी जागा,ओटयावर बांधावयाचे बांधकाम वा प्लॅनमध्ये दाखविल्याप्रमाणे बांधावयाची बिल्डींग या त्याप्रमाणे प्रत्यक्षात करण्याच्या अटीवर देण्यात येत आहे. (सोबत-मंजूर अभिन्यास प्रत)
७ प्रश्नाधिन क्षेत्रात प्रत्यक्ष इमारतींचे बांधकामापुर्वी सार्वजनिक बांधकाम विभाग व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांची रीतसर परवानगी घेणे बंधनकारक राहील.
८. परवानगीदार यांनी बिल्डींग प्लॅन हे संबंधीत सक्षम अधिका-याकडून मंजूर करुन घ्यावेत. ज्या ठिकाणी सक्षम अधिकारी नाही. अशा वेळी परवानगीदार यांनी महाराष्ट्र जमिनी महसुल (जमिनीच्या वापरात बदल-अकृषिक आकारणी)नियम-१९६९ अनुसूची ३ प्रमाणे प्लॅन तयार करुन घेऊन तो या कार्यालयाकडून मंजूर करुन.घेऊन त्याप्रमाणे बांधकाम करावे.
९. परवानादार यांनी राष्ट्रीय महामार्ग जिल्हामार्ग यामधिल रस्त्यांची सिमा व इमारतीची रांग यामधिल व इमारतीची रांग या नियंत्रण रेषामधिल रस्त्यांपासूनचे अंतर हे महाराष्ट्र जमिन.महसुल (जमिनीच्या वापरात बदल-अकृषिक आकारणी)नियम-१९६९ अनुसूची २ प्रमाणे ठेवावे.
१०. परवानादार यांनी हा आदेश दिल्याचे तारखेपासून एक वर्षाचे आंत अकृषिक प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करावा, अन्यथा अकृषिक परवानगीची मुदत या कार्यालयाकडून वेळोवेळी वाढवून घ्यावी. तसे न केल्यास परवानगी रद्द समजण्यात येईल.
११. परवानादार यांनी अकृषिक प्रयोजनाकरिता जमिनीचा उपयोग सुरु केल्याबाबत वा उपयोगात बदल केल्याबाबत एक महिन्याचे आंत संबंधीत स्थानिक तलाठी /तहसिलदार/उप विभागीय अधिकारी यांना कळवावे, अन्यथा परवानादार यांचे विरुध्द म.ज.म.(जमिनीच्या वापरात बदल अकृषिकआकारणी) नियम-१९६९(६) प्रमाणे कार्यवाही करणेत येईल.

१२. परवानदार यांनी जमिनीचा अकृषिक सारा ज्या अकृषिक कारणासाठी परवानगी दिली आहे. त्याच कारणासाठी परवानगी दिलेचे तारखेपासून भरावा. तसेच अकृषिक सारा दर निश्चित होईपर्यंत सदरचा दर अंमलात राहील व त्यानंतर शासनाने निश्चित केलेल्या सुधारीत दराने वेळोवेळी फरकासह भरावा.

१३. सदरहू आदेशातील अकृषिक सारा व सनदेमधिल अकृषिक सारा ज्या ज्या वेळेस अकृषिक सारा बदलेल त्याप्रमाणे सारा फरकासह भरणे बंधनकारक राहील.

१४. परवानादार यांनी मोजणी फी जमिनीचा उपयोग अकृषिक प्रयोजनात आणलेपासून एक महिन्याचे आत भरावी. तसेच ग्रामपंचायतीची वा स्थानिक प्रशासनाची बांधकामापुर्वी परवानगी घेणे बंधनकारक राहील.

१५. म.तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांनी जमिनीची मोजणी केल्यानंतर मोजणीप्रमाणे जमिनीचे क्षेत्रात व अकृषिक सा-यात बदल झाल्यास त्याप्रमाणे क्षेत्र व सारा बदलता राहील.

१६. परवानादार यांना जमिनीचा अकृषिक कारणासाठी उपयोग सुरु केल्यापासून तीन वर्षाचे आंत बिल्डींग व इतर बांधकाम पुर्ण करावे सदरहू मुदतवाढ या कार्यालयाचे आदेशाप्रमाणे परवानेदार यांचेकडून दंड व नजराणा रक्कम भरुन घेऊन वाढवून देण्यात येईल.

१७. परवानादार यांनी बिल्डींग व इतर बांधकामे पुर्ण केल्यानंतर त्यामध्ये वाढ व बांधकाम किंवा बांधकामामध्ये बदल पुर्व परवानगी-शिवाय व सदरहू बांधकामांचे प्लॅन सहा.संचालक,नगररचना/ग्रामपंचायत/या कार्यालयाकडून मंजूर करुन घेतल्याशिवाय करु नये.

१८. परवानादार यांनी म.ज.म.(जमिन वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियम-१९६९ चे अनुसूची-४ वा ५ मध्ये नमूद केलेल्या शर्ती वा नमून्यामध्ये सनद बिनशेती उपयोग सुरु केल्यापासून एक महिन्याचे आंत करुन देणे बंधनकारक राहील.

१९. परवानादार यांचेकडून या आदेशातील/सनदेतील अटी व शर्तीचा भग केल्यास म.ज.म.अधिनियम- १९६६ व त्याखालील नियमाप्रमाणे महसुल अधिकारी जो दंड व सारा फर्मावतील त्याप्रमाणे दंड व सारा भरुन घेऊन नियमत करुन घेता येईल. तसेच खिलाफ अटी व शर्ती नमूद केल्या असल्यातरी सुध्दा महसुल अधिकारी यांना या परवानगीचे विरुध्द बिल्डींग व इतर बांधकामे केली असल्यास वा ते वाढवून वा त्यामध्ये बदल केला असल्यास ते ठराविक मुदतीत काढून टाकण्यास फर्मावण्याचा अधिकार राहील व सदर मुदतीत परवानदार यांनी तसे न केल्यास स्वतः महसुल अधिकारी ते सदरहू बांधकाम काढून टाकतील व ते काढून टाकण्याचा खर्च परवानदार यांचेकडून जमिन महसुलाची बाकी म्हणून वसुल करतील.

२०. सदरहू परवानगी ही इतर कायद्यामधिल तरतूदीस अधिन राहून व सदरहू प्रकरणी त्या कायद्याच्या लागू असलेल्या तरतुदीस अधिन राहून म्हणजे मुंबई कुळकायदा व शेतजमीन अधिनियम-१९४८ व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम व नगरपालिका अधिनियम इ. तरतुदीस अधिन राहून देण्यात येत आहे.

२१. प्रस्तुत बिनशेती क्षेत्रात करणेत येणाऱ्या बांधकामासाठी फ्लॉय - ॲश द्वारे तयार करण्यात आलेल्या विटांचा वापर करणे बंधनकारक राहील.

उप विभागीय अधिकारी
निफाड भाग निफाड

प्रति,
श्री. गोपाळ केशव जाधव व इतर.१
रा. ओझर ता. निफाड जि.नाशिक

प्रतिलिपी -

१. म. तहसिलदार - निफाड यांचेकडेस मुळ संचिका पा.क्रं. १ ते १७१ सह अभिलेखात जतन करणे व योग्य कार्यवाहीकामी रवाना. याशिवाय आणखी असे की, परवानदार यांनी अकृषिक प्रयोजनाकरिता जमिनीचा वापर केल्याबद्दल लक्ष ठेवावे. परवानदार यांनी अकृषिक प्रयोजनाकरिता जमिनीचा वापर सुरु केल्याबाबत कळविल्यानंतर विहीत नमून्यामध्ये तसेच अकृषिक प्रयोजन नोंदवहीमध्ये बिनशेती सारा याबाबत नमूनीच्या दृष्टीने योग्य ती नोंद घ्यावी. परवानदार यांचेकडून योग्य त्या नमुन्यात सनद करुन घ्यावी.

टीप- परवानदार यांनी रुपांतरीत कर -रु/-चलन/पावती क्रं.-दि.- आणि मोजणी फी चलन क्रं. ८६/२०११ दिनांक. ८/७/२०११ रोजी रक्कम रु. २८०७७/- भरली असून ती प्रकरणात सामील केली आहे.

२. म. तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, निफाड यांचेकडे माहितीसाठी अग्रेषित.
३. तलाठी- ओझर ता. निफाड जि.नासिक.
४. म.सहा.संचालक नगर रचना, नासिक यांचेकडेस माहितीसाठी अग्रेषित.
५. सरपंच, ग्रामपंचायत ओझर ता. निफाड.

उप विभागीय अधिकारी
निफाड भाग निफाड

न.प.ड.-२
दस्त क्र. ७०७ /२०२१
२९ — ३४

SEAL OF THE SUB-REGISTRAR GR.I NIPHAD-2

न.प.ड.-२
दस्त क्र. (६७५ /२०२३
२२ / ३४

SEAL OF THE SUB-REGISTRAR GR-I NIPHAD-2

दस्त क्र. (१२२८ /२०२२
१८—३८

# उपविभागीय अधिकारी कार्यालय निफाड उपविभाग निफाड

दुरध्वनी क्रमांक - (०२५५०-२४११५२) फॅक्स क्र. - ०२५५०-२४११५२ e-mail-ID- prant_npd@rediffmail.com

क्रमांक / एन.ए.एसआर / २९ / २०११
निफाड दि. ११ /१०/ २०११

प्रति,
श्री. गोपाळा केशव जाधव व इतर.१
रा. ओझर ता. निफाड जि. नाशिक

विषय :- मौजे ओझर ता. निफाड येथील ग नं /स.नं.२३९८/१ पैकी क्षेत्र ११४०० चौ.मी. यात निवासी प्रयोजनार्थ अंतिम अभिन्यास मंजूरी बाबत..

संदर्भ :- १. आपला दिनांक.२७/९/२०१० चा अर्ज.
२. म सहा.संचालक नगररचना,नाशिक यांचे जा.क्रं.बिशेप/रेखांकन/मौ. ओझर ता.निफाड /ग.नं./ स.नं.२३९८/१पै./संसना/३६१० दिनांक.१७/१०/२०११.

महाशय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविणेत येते की,मौजे ओझर ता. निफाड येथील ग.नं.२३९८/१ पैकी क्षेत्र-११४०० चौ.मी. या जमिनीस म.सहा.संचालक नगररचना, नासिक यांनी संदर्भिय पत्रान्वये उक्त जमिनीच्या क्षेत्राचा अभिन्यासास अंतिम मंजूरी अनुज्ञेय करणेत आलेली आहेत (सोबत झेरॉक्स प्रत जोडली आहे). सदर संदर्भ क्रं.०२ चे नगररचना विभागाचे अभिन्यास पत्रातील अटी व शर्तीस अधिन राहून बिनशेती विषयक इकडील यापुर्वीचे बिनशेती परवानगी आदेशाप्रमाणे अंतिम मंजूरी देण्यात येत आहे.

सदर मिळकतीस या पुर्वी सम क्रमांकाने दिनांक.९/७/२०११ अन्वये देण्यात आलेल्या बिनशेती परवानगी आदेशानुसार व प्रस्तुतचे मंजुर अंतिम अभिन्यासानुसार गांवचे हक्क नोंद पत्रकांत नोंद करतांना शासन महसुल व वन विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील परिपत्रक क्रमांक.जमिन.०१/२००६/प्रक्र१२/ज-१ दिनांक.२५/०५/२००७ व पत्र क्रमांक.जमिन.३०/५/प्रक्र.१२५/ज-६/दिनांक.२१/४/२००७नुसार या कार्यालयाचे पत्र क्रमांक.जमाबंदी/कावि/११५/२००७ दिनांक.२८/५/२००७ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार प्रस्तुत मंजुर अंतिम अभिन्यासातील अंतर्गत रस्ते व खुल्या जागेचे क्षेत्र हे जोपर्यंत नगर पालिका अगर तत्सम स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात येत नाही: तोपर्यंत सदर अंतिम मंजुर अभिन्यासातील अंतर्गत रस्ते व खुल्या जागेच्या क्षेत्रास महाराष्ट्र शासन असे नाव दाखल करावे. व ७/१२ चे इतर हक्कांत मंजुर अभिन्यसातील खुली जागा व अंतर्गत रस्ते असा दाखला घेणेत यावा. व तसा दुरूस्त ७/१२ उतारा व फेर-फार नोंदीची प्रत तलाठी ओझर ता. निफाड यांनी तात्काळ या कार्यालयास सादर करावी.

तसेच प्रस्तुत मंजुर अभिन्यासाची नोंदी बाबत निर्णय घेणे पुर्वी संबंधित मंडळ अधिकारी यांनी स्थळ निरीक्षण करून अर्जदार यांनी जागेवर मंजुर अभिन्यासाप्रमाणे भुखंडांचे सिमांकन करून अंतर्गत रस्ते, गटारी, केलेल्या आहेत अगर कसे, या बाबत खात्री करून तसा दाखला नोंदीच्या निर्णयामध्ये नमुद करावा.

सोबत उक्त संदर्भिय पत्राची फोटोप्रत व मंजूर अभिन्यासाचे प्रत जोडली आहे.

उप विभागीय अधिकारी
निफाड भाग निफाड

प्रत-
१. म. तहसिलदार निफाड यांचे कडेस मुळ संचिका पानांक १ते सह माहिती व आवश्यक कार्यवाहीकामी रवाना.
२/- सदरची कागदपत्र या कार्यालयाकडील दिनांक.९/७/२०११ चे समक्रमांकाच्या बिनशेती आदेश संचिकेत सामिल करून सदर आदेशात नमुद केले नुसार योग्य ती कार्यवाही करावी.
२. कामगार तलाठी- ओझर ता. निफाड यांचे कडेस नियमानुसार आवश्यक कार्यवाहीकामी रवाना.

उप विभागीय अधिकारी
निफाड भाग निफाड

Na.Final-ti-Adesh.- 11 -

न.प.ड.-२
दस्त क्र. ६८७/२०२४
२८ — ३४

SEAL OF THE SUB-REGISTRAR GR-1 NIPHAD-2

ग्रामपालिका कार्यालय ओझर (मिग) ता. निफाड

२२/१२/२०१२

दिनाक : ८ / ६ /२०१२ **बांधकाम परवानगी** जा. नंबर : 588

प्रती,
मे. [handwritten]
(१) [handwritten] (२) [handwritten] (३) [handwritten] ओझर, ता. निफाड, यांस

मे.सरपंच साहेब. ग्रामपालिका ओझर, ता. निफाड, जि. नाशिक यांजकडून –

विषय – बांधकाम परवानगी बाबत

संदर्भ – ग्रामपंचायत ओझर (मिग) ता. निफाड जि. नाशिक येथील [handwritten] ... क्षेत्रफळ ... चौ.मी. ... पार्किंग, पहिला, दुसरा, तिसरा, चौथा मजला ... चे बांधकाम करणेस खालील शर्तीच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे सदरचे बांधकाम ... करण्यात यावे.

शर्त १ – आपण बांधकाम करतांना सरकारी व खाजगी जागेत अतिक्रमण न होऊ देता व कोणतेही रस्त्याचे व इमारतीचे नुकसान न होता बांधकाम करावे.

शर्त २ – घर नंबर —— पुढिल जागा नंबर ७६५०, ७६५१ ही प्रॉपर्टी तुमचे नांवावर आहे. तुमचे मालकी हक्काप्रमाणे जागा मोजून घेऊन त्यात आपण दक्षिण – उत्तर फुट —— व पुर्व – पश्चिम फुट ७५७०४ चौ.मी. असे बांधकाम करावे.

शर्त ३ – ओझर गांवी टाऊन प्लॅनिंग स्कीम लागू झाल्यास व भविष्य काळातील सर्व रस्तावर व वस्तीवाढ या दृष्टीने सार्वजनिक हित लक्षात घेऊन व रस्ता जास्तीत जास्त रुंद सोडून बांधकाम करावे.

शर्त ४ – टाऊन प्लॅनिंग स्कीममुळे पुढे मागे सार्वजनिक हितासाठी बांधकाम वगैरे काढावे लागल्यास त्यास आपणच जबाबदार आहात. ग्रामपालिका कोणत्याही प्रकारची जबाबदारी घेणार नाही अगर नुकसान भरपाई देणार नाही. आपल्या जागेची सिटी सर्व्हेच्या नकाशावरून खात्री करून घेऊन बांधकाम करावे व घरापुढे आजुबाजूस कमीत कमी ५ झाडे लावणे आवश्यक आहे.

शर्त ५ – आपल्या सांडपाण्याची व्यवस्था दुसऱ्या कोणत्याही इमारतीस ओल न येऊ देता आपण स्वतंत्रपणे मालकी हक्काचे जागेत आड तयार करून करावीत व सांडपाण्याचे घाणीमुळे सार्वजनिक आरोग्यास धोका येऊ देऊ नये.

शर्त ६ – निसर्गाचे ( पावसाचे ) पाणी आपण पूर्व वहिवाटीप्रमाणे काढावे. फेरफार केल्यास त्या पाण्याची व्यवस्था दुसऱ्यास उपद्रव न होऊ देता स्वतःचे मालकी हक्कातून करावी व सांडपाणी गटारीचे पाणी जाण्याची योग्य व्यवस्था करण्यात यावी.

शर्त ७ – आपल्या बांधकामाचे मटेरीअल ग्रामपालिकेच्या पुर्व मंजुरीशिवाय रस्त्यात ठेऊ नये.

शर्त ८ – बांधकाम परवानगी मिळाले तारखेपासून एक वर्षापर्यंत बांधकामाची मुदत राहिल, वर्षानंतर बांधकामाची सुरूवात केल्यास नविन परवानगी घ्यावी लागेल. व ही परवानगी रद्द समजण्यात येईल.

शर्त ९ – बांधकाम करतांनी घरामध्ये संडास बांधणे जरूरीचे आहे. घरात संडास नसेल तर बांधकाम परवानगी रद्द समजण्यात येईल.

टीप जादा शर्त – वरील शर्तीचे व बाबींचे पालन अतिक्रमण होऊ न देता करावे. मालकी जागेत पुढचे रस्त्याचे बाजूने मागे जाऊन अर्जाप्रमाणे समक्ष येऊन चौकशी केल्याप्रमाणे पुर्व-पश्चिम फुट —— व दक्षिण – उत्तर फुट —— असे बांधकाम करण्यास परवानगी दिली आहे.

वरील सर्व शर्ती व बाबींचे उलंघन झाल्यास परवानगी रद्द करण्यात येईल व पुढील कायदेशीर बाबीस तुम्ही जबाबदार राहाल. याची जाणीव ठेवून बांधकाम करावे. कळावे, तारीख :- ०८/०६/२०१२

| | | | |
|---|---|---|---|
| लिपिक | ग्रामविकास अधिकारी | सभासद | सरपंच |
| ग्रामपालिका ओझर (मिग) | ग्रामपालिका ओझर (मिग) | बांधकाम समिती ग्रामपालिका ओझर (मिग) | ग्रामपालिका ओझर (मिग) |

Scanned with OKEN Scanner

॥ सत्यमेव जयते ॥

# ग्रामपंचायत कार्यालय, ओझर (मिग)

ता. निफाड, जि. नाशिक • फोन (०२५५०) २७५०५४

जावक क्रमांक : 

दिनांक : 03/0८/२०२०

## दाखला

सरपंच/ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत ओझर (मिग) ता.निफाड जि.नाशिक यांचेकडून दाखला देण्यात येतो की, बिनशेती गट नं.२३९८/१/१ यामधील प्लॉट नं.१३ व १४ त्याचे ग्रा.पं.मि.नं.७६५० व ७६५१ यामध्ये बांधकाम केलेल्या आर.सी.सी. इमारतीतील १ ते १२ फ्लॅट ही मिळकत मे. बालाजी इन्फ्रास्ट्रक्चर भागीदारी फर्म तर्फे भागीदार श्री.अनिल महिंदरलाल अरोरा, श्री.निलेश जयंतीलाल पटेल, श्री.ब्रिजेश जतीनभाई टांक, श्री.ध्रुव हितेशभाई टांक यांचे नावावर असून सदर फ्लॅट मिळकतींचे बांधकाम पुर्ण झालेले आहे. सदर दाखला ग्रा.पं.रेकॉर्डची शहानिशा करुन दिला दिला असे.

ता.०३/०८/२०२०

लिपिक
ग्रामपंचायत, ओझर (मिग)

ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत ओझर(मिग),ता.निफाड,जि.नाशिक

सरपंच

न.प.ड.-२
दस्त क्र. (७८७ /२०२१
७५ — ९५

SEAL OF THE SUB-REGISTRAR GR.I NIPHAD-2